RNI No. MAHBIL /2009/35529

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक ५०] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर ११-१७ ,२०२५/अग्रहायण २०-२६, शके १९४७ [पृष्ठे १८, किंमत : रुपये १४.००

प्राधिकृत प्रकाशन

उप विभागीय अधिकारी, राजापूर यांजकडून

अधिसूचना

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक एलएक्यु/एसआर/१५६.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक १६ मार्च २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी लघु पाटबंधारे योजना जांभवली, मौजे—जांभवली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी भूसंपादन होत असून यात यासोबत जोडलेल्या अनुसुचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन संपादन करण्याचा, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचा उद्देश आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनमध्ये देण्यात आलेल्या सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करण्यासंबंधीतील तरतुदी विचारात घेता, समुचित शासनाने सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्याचा समुचित शासनाचा हेतु असल्यास ते बाधित क्षेत्रामधील ग्राम स्तरावर किंवा वॉर्डस्तरावरील संबंधित पंचायत, नगरपालिका किंवा यथस्थिती, महानगरपालिका यांच्याशी विचारविनिमय करून अशा शासनाकडून अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रितीने आणि अशा दिनांकापासून सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अंमलात आणेल अशी तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम १ मध्ये करण्यात आली आहे.

त्याअर्थी, आता उपरोक्त कायद्याचे कलम ३ चे पोट-कलम (ई) प्रमाणे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना समुचित शासन म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे आणि कलम ३ चे पोट-कलम (ग) नुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी त्यांचे वतीने पुढील कार्यवाही करण्यासाठी उप विभागीय अधिकारी, राजापूर यांना प्राधिकृत केले आहे. सबब याद्वारे उप विभागीय अधिकारी, राजापूर असे अधिसूचित करीत आहे की, बाधित क्षेत्रामध्ये भाकर सेवा संस्था, मु.पो.कोंड्ये, ता.लांजा, जि.रत्नागिरी, यांच्याकडून भूमी संपादन पुनर्वसन आणि पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४, मध्ये विहित केलेल्या रितीने दिनांक २४ डिसेंबर २०२५ पासून सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्यात येईल.

अनुसूची

भूसंपादन संस्थेचे नाव — जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कुवारबांव रत्नागिरी.

प्रयोजन :- लघुपाटबंधारे योजना सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश व पुच्छ कालवा विमोचक बुडीत क्षेत्र व पोहोच रस्ता या प्रयोजनासाठी.

गावाचे नाव :- मौजे-जांभवली, ता. राजापुर, जि. रत्नागिरी

एकूण क्षेत्र :- ४२.०५.४४ (हे. आर.)

अनुक्रमांक	सर्वे नंबर/ गट नंबर	संपादन करावयाच्या क्षेत्राचा चतु:सिमा			
		संपादन क्षेत्राच्या पूर्व सिमेस सर्व्हे नं./हि.नं.	संपादन क्षेत्राच्या पश्चिम सिमेस सर्व्हे नं./हि.नं.	संपादन क्षेत्राच्या उत्तर सिमेस सर्व्हे नं./ हि.नं.	संपादन क्षेत्राच्या दक्षिण सिमेस सर्व्हे नं./हि.नं.
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	३३/८ पै	३३/१७	३३/१२	-	३३/१२, ३३/१७
२	३३/१२ पै	३३/१७	-	३३/८	३३/१५, ३३/१६
३	३३/१५ पै	३३/१६	-	३३/१२	३३/१६
४	३३/१६	३३/१७	३३/१५	३३/१२	३८/१
५	३३/१७ पै	३८/२	३३/८, ३३/१२, ३३/१६	३३/८	३८/२
६	३५/२ पै	३५/५	-	-	३५/९
७	३५/४ पै	३५/५	-	-	३५/५
८	३५/५ पै	३८/१, ३८/२, ३८/४	३५/२, ३५/९	३५/४	३६, वहाळ
९	३५/८ पै	३६, वहाळ	-	३५/५	वहाळ
१०	३५/९ पै	३५/५	-	३५/२	३५/५
११	३६/०	३५/५	३५/८, ३५/५	३५/५	वहाळ
१२	३७/२ पै	३७/३	-	वहाळ	३७/५
१३	३७/३ पै	३८/७, ३८/१०	३७/२, ३७/५, ३७/७	वहाळ,३८/४	३७/७
१४	३७/५ पै	३७/३	-	३७/२,३७/३	३७/६, ३७/७
१५	३७/६ पै	३७/७	-	३७/५	-
१६	३७/७ पै	३७/३	३७/६	३७/५, ३७/३	-
१७	३८/१	३८/२	३५/५	३३/१६	३५/५
१८	३८/२ पै	३८/३	३८/१	३३/१७	३८/४

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१९	३८/३ पै	-	३८/२	-	३८/५
२०	३८/४	३८/५, ३८/७	३५/५, वहाळ	३८/२	३८/७, ३७/३
२१	३८/५	३८/८	३८/४, ३८/७	३८/३	३८/११, ३८/७
२२	३८/६ पै	३८/९	३८/८	-	३८/९, ३८/८
२३	३८/७	३८/५	३७/३	३८/४	३८/१०
२४	३८/८ पै	३८/६, ३८/९, ३८/११	३८/५	३८/६	३८/५, ३८/११
२५	३८/९ पै	-	३८/६	-	३८/११
२६	३८/१० पै	३८/११, ३८/१३, ३९/४, ३९/३, ३९/२	३७/३	३८/७, ३८/११, ३८/५	३९/१
२७	३८/११ पै	-	३८/५	३८/८, ३८/६, ३८/९	३८/१३, ३९/८, ३९/९
२८	३८/१३ पै	३८/५	३८/१०	३८/११	३९/४
२९	३९/१ पै	३९/२	-	३८/१०	३९/११
३०	३९/२ पै	-	३९/१, ३९/११, ३९/१४, ३९/१५	३८/१०	३९/२२, ३९/२४
३१	३९/३ पै	३९/१२	३९/२	३९/४	-
३२	३९/४	३९/५, ३९/१२	३९/३, ३८/१३	३८/१३	३९/३
३३	३९/५ पै	३९/६	३९/४	३८/१३	३९/१२
३४	३९/६ पै	-	३९/५, ३९/१२	३९/५	३९/१८
३५	३९/८ पै	३९/९, ३९/१३	३८/११	३८/११	-
३६	३९/९ पै	-	३९/८, ३९/१३	३८/११	-
३७	३९/११ पै	३९/२	-	३९/११	३९/१४
३८	३९/१२ पै	३९/६, ३९/१८	३९/३	३९/४, ३९/५, ३९/६	-
३९	३९/१३ पै	३९/९	३९/८	३९/९, ३९/८	-
४०	३९/१४ पै	३९/२	-	३९/११	३९/१५
४१	३९/१५ पै	३९/२	-	३९/१४	३९/१६
४२	३९/१६ पै	-	-	३९/१५	-
४३	३९/१७	३९/२२, ४०/५	३९/१५, ३९/१६	३९/२	४०/४
४४	३९/१८ पै	-	३९/१२	३९/६	-
४५	३९/२० पै	३९/२१	३९/१३	३९/९	३९/१९
४६	३९/२२	३९/२	-	३९/२	४०/५,४०/६
४७	३९/२४ पै	-	३९/२	३९/२	४०/७
४८	४०/२ पै	४०/९	-	-	४०/१४
४९	४०/३ पै	४०/४	-	३९/१६	४०/९
५०	४०/४	४०/५, ४०/१०	४०/३	३९/१७	४०/९
५१	४०/५ पै	४०/६	४०/१०	३९/२२	-

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
५२	४०/६ पै	४०/७, ४०/८	४०/५	३९/२२	-
५३	४०/७ पै	-	४०/६	३९/२४	४०/८
५४	४०/८ पै	-	४०/६	४०/७	-
५५	४०/९	४०/१०	४०/२	-	४०/१४
५६	४०/१० पै	४०/५	४०/९, ४०/१४	४०/५	४३/२
५७	४०/१४ पै	४०/१०	-	४०/२, ४०/९	४०/१०
५८	४३/२ पै	-	-	४०/१०	४३/११, ४३/१२
५९	४३/११ पै	४३/२, ४३/१२	-	४३/२	४३/१९, ४३/२०
६०	४३/१२ पै	-	४३/११	४३/२	४३/२०
६१	४३/१९ पै	४३/२०, ४३/२७	-	४३/११	४३/३१, ४३/३२
६२	४३/२० पै	४३/१२	४३/११, ४३/१९	४३/१२	४३/२७
६३	४३/२७ पै	-	४३/१९	४३/२०	४३/३२
६४	४३/३१ पै	४३/३२	-	४३/१९	-
६५	४३/३२ पै	-	४३/३१	४३/१९, ४३/२७	-
६६	४३/४३ पै	४३/३२	-	४३/३१	-

डॉ. जॅसमिन,
सहायक जिल्हाधिकारी (भा.प्र.से.)
तथा उप विभागीय अधिकारी, राजापूर.

राजापूर,
दिनांक ८ डिसेंबर २०२५.

नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ नोव्हेंबर २०२५

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक न नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीबी ४३१९/४४/प्र.क्र.१५५/२०१९/नवि-११.—ज्याअर्थी, नगररचना योजना मुंबई सिटी माहीम क्र. IV, (मूळ) (अंतिम) शासनाने मंजूर केली असून ती दिनांक १५ ऑगस्ट १९६३ पासून अंमलात आली आहे आणि ज्याअर्थी, नगररचना योजना मुंबई सिटी माहीम क्र. IV (प्रथम फेरबदल) (अंतिम), ही शासनाने मंजूर केलेली असून ती दिनांक १ मे १९७७ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे याचा उल्लेख " उक्त नगररचना योजना " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेने (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त महानगरपालिका " असा करण्यात आला आहे) दिनांक १७ जानेवारी २०१९ रोजीचे पत्रान्वये असे कळविले आहे की, अधीक्षक, मुंबई नगर भूमापन व भूमी अभिलेख (शहर) (यापुढे याचा उल्लेख " एसएलआर " असा करण्यात आला आहे) यांचे दिनांक २ जानेवारी २०१७ व दिनांक ४ ऑगस्ट २०१८ रोजीचे पत्र उक्त महापालिकेस प्राप्त झाले आहे. ज्याद्वारे एसएलआर यांनी उक्त नगररचना योजना अंतिम भूखंड क्र. १२१६ (१), अंतिम भूखंड क्र. १२१६(९), अंतिम भूखंड क्र. १२२४(B) व अंतिम भूखंड क्र. १२२४(८) (यापुढे याचा उल्लेख " उक्त अंतिम भूखंड " असे करण्यात आला आहे) या भूखंडाच्या क्षेत्रामध्ये मोजणीअंती तफावत आढळून आली असल्याचे उक्त महापालिकेस कळवले आहे ;

आणि ज्याअर्थी, एसएलआर यांनी दिनांक ४ ऑगस्ट २०१८ रोजीच्या पत्राद्वारे उक्त महापालिकेस कळवले आहे की, अंतिम भूखंड क्र. १२१६(A) वगळता, नगररचना योजना मुंबई सिटी क्र. IV माहिम (प्रथम फेरबदल) (अंतिम) नुसारचे अंतिम भूखंड क्र. १२१६(१), अंतिम भूखंड क्र. १२१६ (९), अंतिम भूखंड क्र. १२२४/B व अंतिम भूखंड क्र.१२२४/C या भूखंडांचे मंजूर क्षेत्रफळ व एसएलआर या कार्यालयाकडून केलेल्या मोजणीअंती येणारे क्षेत्रफळ या मध्ये तफावत असून या चारही अंतिम भूखंडाचे क्षेत्रफळ हे उक्त नगररचना योजना प्रमाणे नसून त्यांच्या क्षेत्रात तफावत आढळून येते ;

आणि ज्याअर्थी, जागेवर प्रत्यक्ष सर्व्हेक्षण आणि संयुक्त मोजणी करून, एसएलआर यांनी त्यांचेकडील दिनांक २३ ऑक्टोबर २०१८ रोजीचे महापालिकेस सादर केलेल्या पत्राद्वारे वरील भूखंडांचे क्षेत्राबाबत आवश्यक सुधारणा करण्याबाबत विनंती केली. आणि ज्याअर्थी, एसएलआर यांचे विनंतीनुसार, अंतिम भूखंड क्र. १२१६(१) चे क्षेत्रात ८५११.७७ चौ.मी. ऐवजी ७७३०.०० चौ.मी., अंतिम भूखंड क्र.१२१६ (९) चे क्षेत्रात ४४७४.११ चौ.मी. ऐवजी ४९५६.८८ चौ.मी., अंतिम भूखंड क्र. १२२४(B) चे क्षेत्रात १८३९.४७ चौ.मी. ऐवजी १७३८.०० चौ.मी. व अंतिम भूखंड क्र. १२२४(C) चे क्षेत्रात १२०८.२० चौ.मी. ऐवजी ११९१.५० चौ.मी. असा बदल करणेबाबत उक्त महानगरपालिकेने दिनांक ७ जानेवारी २०१९ व दिनांक २० मे २०१९ रोजीच्या पत्रांद्वारे विनंती केली ;

आणि ज्याअर्थी, वरील विचारात घेता उक्त महानगरपालिकेने दिनांक १७ जानेवारी २०१९ व दिनांक २० मे २०१९ रोजीच्या पत्रान्वये उक्त नगररचना योजनेत सुधारणा करण्याबाबत विनंती केली असून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ९१ (२) अन्वये उक्त नगररचना योजनेमध्ये फेरबदलासाठी निदेश देणेबाबत शासन नगर विकास विभागास विनंती केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त नमूद वस्तुस्थिती आणि उक्त महानगरपालिकेने केलेली विनंती विचारात घेता, उक्त नगररचना योजनेत बदल करणे आवश्यक होत असून, सदर बदल हा व्यापक बदल नाही ;

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीबी-४३१९/४४/प्र.क्र.१५५/२०१९/नवि-११ दिनांक ७ मार्च २०२२ द्वारे उक्त अधिनियमाचे कलम ९१ चे पोट-कलम (२) अन्वये उक्त नगररचना योजनेमध्ये फेरबदल करण्याचे शासनाने उक्त महानगरपालिकेस निर्देश दिले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ९१ अन्वये सदर प्रारूप फेरबदल (Variation) तयार करून सदर प्रारूप फेरबदल प्रसिद्ध करण्याच्या प्रस्तावास (यापुढे याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे) प्रशासक (सुधार समिती) ठराव क्र.६, दिनांक २४ जून २०२४ व प्रशासक (महागरपालिका) ठराव क्र.२३६, दिनांक ८ जुलै २०२४ अन्वये मंजूरी दिली आहे; आणि ज्याअर्थी, त्यानुसार उक्त महानगरपालिकेने प्रस्तावित फेरबदलाची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** दिनांक २९ ऑगस्ट -४ सप्टेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध केली आहे आणि उक्त महानगरपालिकेने उक्त

अधिनियमाचे कलम ९१ खालील वैधानिक कार्यवाही पार पाडून दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजीचे पत्रान्वये उक्त नगररचना योजनेतील फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने **शासन राजपत्रात** दिनांक २९ ऑगस्ट -४ सप्टेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या फेरबदलास उक्त अधिनियमाचे कलम ९१(६) (बी) अन्वये मान्यता देणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६चे कलम ९१(६)(बी) अन्वये प्राप्त अधिकारानुसार उक्त नगररचना योजनेतील प्रस्तावित फेरबदलास राज्य शासन खालीलप्रमाणे मान्यता देत आहे.

नगररचना योजना माहीम क्र. IV (प्रथम फेरबदल) (अंतिम), मधील अंतिम भूखंड क्र. १२१६(१), व अंतिम भूखंड क्र. १२१६(९), अंतिम भूखंड क्र.१२२४(B) व अंतिम भूखंड क्र.१२२४(C) चे क्षेत्रात खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे :-

अ.क्र.	**अंतिम भूखंड क्रमांक**	**न.र.योजनेच्या फॉर्म –बी प्रमाणे क्षेत्र (चौ.मी.)**	**सुधारीत क्षेत्र (चौ.मी.)**
(१)	(२)	(३)	(४)
१	१२१६(१)	८५११.७७	७७३०
२	१२१६(९)	४४७४.११	४९५६.८८
३	१२२४(B)	१८३९.४७	१७३८
४	१२२४(C)	१२०८.२०	११९१.५

टीप .—अंतिम भूखंड क्र.१२१६(९) मध्ये जास्तीचे भरणाऱ्या ४८२.७७ चौ.मी. क्षेत्राकरिता (*i.e.*४९५६.८८-४४७४.११) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे तरतुदीनुसार संबंधित जमिनीमालकाकडून महापालिकेने अंशदान वसूल करून घेण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मुंबई,
दिनांक ३ डिसेंबर २०२५.

अमर पाटील,
शासनाचे अवर सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 27th November 2025

NOTIFICATION

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT,1966.

No.TPB-4319/44/CR-155/2019/UD-11.—Whereas, the Town Planning Scheme Mumbai City No. IV, Mahim (Principal) (Final) has been sanctioned by the Government and came into force with effect from 15th August 1963 and whereas, Town Planning Scheme Mumbai City No. IV, Mahim (1st Variation) (Final) has been sanctioned by the State Government and came into force with effect from 1st May 1977. (hereinafter referred to as "the said Scheme") ;

And whereas, Municipal Corporation of Greater Mumbai (hereinafter referred to as " the said Corporation") *vide* their letter dated 17th January 2019 has informed that the said Corporation has received letters dated 2nd January 2017 and dated 4th August 2018 from Superintendent, Mumbai City Survey and Land Records (city), (hereinafter referred to as "SLR") wherein SLR has informed actual area as per measurement on site in respect of F.P. No. 1216(1), F.P. No.1216(9), F.P. No. 1224(B)/ and F.P. No.1224 (C) (hereinafter referred to as " said Final Plots ") differs from area as per said scheme ;

And whereas, SLR *vide* his letter dated 4th August 2018 has informed to said corporation that except the area of F.P. No.1216(A) the area of F.P. No. 1216(1), F.P. No.1216(9), F.P. No.1224(B) and F.P. No.1224(C) is not according to sanctioned Town Planning Scheme Mumbai City No.IV, Mahim (1st Variation) (Final) ;

And whereas, after carrying out Survey and joint measurement, SLR *vide* his letter dated 23rd October 2018 to said Corporation, has requested for necessary corrections in the area of the said final plots. And whereas, as per the request of SLR, the said corporation *vide* their letters dated 17th January 2019 read with letter dated 20th May 2019 have requested to correct the areas of said plots *i.e.* F.P. No. 1216(1) from 8511.77 sq.mt. to 7730.00 sq.mt., F.P. No. 1216(9) from 4474.11 sq.mt. to 4956.88 sq.mt., F.P. No. 1224(B) from 1839.47 sq.mt. to 1738 sq.mt., and F.P. No. 1224(C) from 1208.20 sq.mt. to 1191.50 sq.mt. respectively ;

And whereas, considering above the said Corporation *vide* their letters dated 17th January 2019 and dated 20th May 2019 has requested for variation of the said Scheme and has requested the Government in Urban Development Department to issue directives for processing proposal for the variation of the said Scheme, as provided under section 91(2) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 ;

And whereas, considering the above mentioned facts and the said Corporation's request, the Government found it necessary to vary the said scheme and the variation required to be made, is not of a substantial nature ;

And whereas, the Government in Urban Development Department *vide* Notification No.TPB-4319/44/CR-155/2019/UD-11, dated 7th March 2022 has directed the said Corporation to undertake the variation of the said Scheme under sub-section (*2*) of Section 91 of the said Act ;

And whereas, the Administrator (Improvement Committee) *vide* Resolution No. 6, dated 24th June 2024 and Administrator (Corporation) *vide* Resolution No. 236, dated 8th July 2024 have approved the proposal to prepare and publish the draft variation (hereinafter referred to as "proposed variation") as per the provisions laid down under section 91 of the said Act; and whereas, accordingly a notice inviting suggestion/objection from the general public for the proposed variation was published by the said Corporation in *Maharashtra Government Gazette* dated 29th August-4th September, 2024 and the said Corporation *vide* its letter dated 4th February 2025 has accordingly submitted variation proposal in respect of the said Scheme for final sanction to government after following the procedure laid down under section 91 of the said Act ;

And whereas, Government is of the opinion that the variation published by the said Corporation in *Government Gazette* dated 29th August- 4th September 2024 needs to be sanctioned under section 91(6)(b) of the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred under section 91(6)(b) of the said Act, the Government hereby sanctions the proposed variation in the said Scheme as follows :—

The area of F.P. No. 1216 (1), 1216 (9), 1224 (B), 1224 (C) of Town Planning Scheme No. IV, Mahim (1 Variation) (Final) is corrected as shown in the table below :—

Sr. No. (1)	**Final Plot No.** (2)	**Area shown as per Form-B of said scheme (sq.m)** (3)	**Corrected area (sq.m)** (4)
1	1216 (1)	8511.77	7730
2	1216 (9)	4474.11	4956.88
3	1224 (B)	1839.47	1738
4	1224 (C)	1208.20	1191.5

Note.— The contribution for the F.P.No.1216(9) against the additional area of 482.77sq.m (*i.e.* 4965.88- 4474.11) shall be levied by the Corporation from the concerned land owner as per provision of MRTP Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Mumbai,
dated 27th November 2025.

AMAR PATIL,
Under Secretary to Government.

जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांजकडून

अधिसूचना

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक LAC-१६०२६/१६/२०१६/SR-२२ .—ज्याअर्थी " भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्सवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३" (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत);

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भाराच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम(५) अनुसार, जिल्हाधिकारी " भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ " (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यायावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), जिल्हा मुख्यालय, सिंधुदुर्ग यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची – एक

जमिनीचे वर्णन

गांव–शिरवल, तालुका–कणकवली, जिल्हा–सिंधुदुर्ग

अ. क्र.	गट नंबर	अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये)
(१)	(२)	(३)
१	१९००	०.०३००
२	१९०१	०.०४००
३	१९०२	०.११००
४	१९०३/५	०.०४५०
५	१९०३/४	०.०५००
६	१९०३/६	०.०८००
७	१९०३/७	०.०५००
८	१९०३/१	०.०४५०
९	१९०४	०.०७००
१०	१९०५	०.०८००
११	१९०६	०.०५००
१२	१८८४	०.०१००
१३	२५३७	०.०२००
१४	२५३८	०.०६००
१५	२५३९	०.०१५०
१६	२५४७	०.०३५०
१७	२५४६/१	०.१८००
१८	२७२२	०.०२५०
१९	२७२३	०.०२५०
२०	२७२४	०.०२५०
२१	२७२०/१	०.०७००
एकूण		**१.११५**

अनुसूची– दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव – लघु पाटबंधारे योजना शिरवल, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग

प्रकल्प कार्याचे वर्ष – १९९८

समाजाला मिळणारे लाभ —पायाभूत सूविधा (सिंचन क्षेत्रात वाढ व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता) सदर लघुपाटबंधारे प्रकल्प हा सिंचन प्रकल्प असून, या प्रकल्पामुळे मौजे शिरवल, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग, येथील १४५.०० हेक्टर शेत जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे हित साध्य होणार आहे. तसेच प्रकल्पामुळे पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे.

अनुसूची – तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही.

अनुसूची – चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

सदर प्रकल्पास महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, यांची अधिसूचना दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ अन्वये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १० क नुसार अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

अनुसूची – पाच

प्रशासकाची नियुक्ती करणेची आवश्यकता नाही.

टीप.—उक्त जमीनीचे आराखडे उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), जिल्हा मुख्यालय, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत निरीक्षण करता येतील.

शारदा पोवार,
उप जिल्हाधिकारी,
भूसंपादन, जिल्हा मुख्यालय, सिंधुदुर्ग.

सिंधुदुर्गनगरी,
दिनांक २६ नोव्हेंबर २०२५

नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ डिसेंबर २०२५.

अधिसूचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टीपीएस- १२२४/१४१/प्र. क्र. १२१/२४/नवि-१२.—ज्याअर्थी, नगररचना योजना क्र.१ ठाणे (यापुढे जिचा उल्लेख " उक्त नगररचना योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) चे कलम ८६ (२) मधील तरतुदीनुसार शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस – १२७८/ ११०६/ नवि -५, दिनांक १८ जानेवारी १९८५ अन्वये मंजूर झाली असून, दिनांक १ मे १९८५ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगररचना योजनेच्या स्कीम बुकच्या " फार्म-बी " मधील अ. क्र. १२४ येथे स. नं. ९१/२ या भुखंडाकरिता मूळ भुखंड क्र. २४८ चे एकूण क्षेत्र ८७७७.५ चौ. मी. असून, जमीन मालक सदरी १) श्रीमती मेंगीबाई प्रेमजी ठक्कर व २) मे. उर्मी केमीकल्स भागीदार श्री. डी. डी. शाह व इतर असे असून, अंतिम भूखंडाचे रकान्यामध्ये अ. क्र. (१) च्या मालकी समोर अं भू. क्र. १४९, क्षेत्र ५६९५.५९ चौ.मी. व अं. क्र. (२) च्या मालकी समोर अं. भू. क्र. १६३, क्षेत्र १६८२.४८ चौ.मी. अशी नोंद दर्शविण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, " फार्म-बी " नुसार मालमत्ता पत्रकामध्ये नोंद घेणे आवश्यक असतांना, मालमत्ता पत्रकावर अंतिम भूखंड क्र. १४९ व अंतिम भूखंड क्र. १६३ मध्ये " फार्म-बी " नुसार मालकी हक्कामध्ये नमूद (१) श्रीमती मेंगीबाई प्रेमजी ठक्कर व (२) मे. उर्मी केमीकल्स भागीदार श्री. डी. डी. शाह व इतर यांचे नावे संयुक्त दर्शविण्यात येत असून, सदर दोन्ही मालकांच्या अनुक्रमांकामध्ये विभाजीत रेषा टाकणेबाबत श्री. आनंदनगर को. ऑ. सोसायटी यांचेवतीने वास्तुविशारद यांनी ठाणे महानगरपालिके कडे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, उक्त अधिनियमाच्या कलम ९१ नुसार, उक्त नगररचना योजनेमध्ये फेरबदल करण्याची विनंती सहाय्यक संचालक नगररचना, ठाणे महानगरपालिका यांनी शासनास दिनांक २६ सप्टेंबर २०१९ च्या पत्रान्वये केली आहे ;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर, उक्त नगररचना योजनेच्या " फार्म-बी " च्या तक्त्यामध्ये अ. क्र.१२४ मधील मालकी हक्कामध्ये अनु. क्र.१ व अनुक्रमांक २ मध्ये नमूद मालकीनुसार, अंतिम भूखंडाच्या तक्त्यामध्ये त्यानुसार अनुक्रमांक नमूद करण्याअनुषंगाने उक्त नगररचना योजनेमध्ये फेरफार करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त प्रस्तावित फेरफार " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ९१ चे पोट-कलम (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार राज्य शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस -१२१९/२८२२/प्र.क्र.५१/२२ /२२/नवि-१२, दिनांक २४ मे २०२३ अन्वये ठाणे महानगरपालिकेस नगररचना योजना क्र.-१. मध्ये उक्त प्रस्तावित फेरबदल कार्यान्वीत करण्यासाठी प्राधिकृत केले आहे ;

आणी ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने उक्त प्रस्तावित फेरफाराचा प्रस्ताव शासनास दिनांक २६ ऑक्टोबर २०२३ च्या पत्रान्वये मान्यतेकरीता सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर, उक्त प्रस्तावित फेरफार उक्त अधिनियमाच्या कलम ९१ (६) (बी) मधील तरतुदीनुसार मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, आता शासन याद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ९१(६) (बी) मधील प्रदत्त अधिकारात,

(१) उक्त प्रस्तावित फेरफार मंजूर करीत आहे.

(२) नगररचना योजना क्र.१ ठाणे च्या फार्म-बी मधील अ. क्र. १२४ मध्ये अंतिम भूखंड क्र. १४९, श्रीमती मेंगीबाई प्रेमजी ठक्कर व अ. क्र. १२४अ अन्वये अंतिम भूखंड क्र. १६३, मे. उर्मी केमिकल्स भागीदार श्री. डी. डी. शाह व ३ इतर यांचे नावे खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार नमूद करण्यात येत आहे.

अ. क्र. (१)	**मालकाचे नाव** (२)	**अंतिम भूखंड क्रमांक** (३)
१२४	श्रीमती मेंगीबाई प्रेमजी ठक्कर	१४९
१२४अ	मे. उर्मी केमिकल्स भागीदार श्री. डी. डी. शाह व ३ इतर	१६३

०२. सदरचा फेरफार ही अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

०३. उक्त मंजूर फेरफाराची अधिसूचना व त्यासोबतचा " फार्म-बी " १ (एक) महिन्याच्या कालावधीसाठी खालील नमूद कार्यालयात कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१)आयुक्त, ठाणे महानगरपालिका , ठाणे.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे.

०४. सदरची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या website www.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वि. गो. मोरे,

कार्यासन अधिकारी.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 3rd December 2025.

NOTIFICATION

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No.TPS-1224/141/CR-121/24/UD-12.—Whereas, Town Planning Scheme No. 1, Thane (hereinafter referred to as " the said Town Planning Scheme")has been sanctioned by the State Government in Urban Development Department *vide* Notification No.TPS-1278/1106/UD-5, dated the 18th January 1985 under the provisions of Section 86(2) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") which has come into force with effect from 1st May 1985 ;

And whereas, at Sr. No.124 in the said " Form-B " of the said Town Planning Scheme, the land bearing S. No. 91/2 has given Original Plot No. 248 Total area admeasuring 8777.5 and has given the Final Plot No.149, area 5695.59 Sq.mt. and Final Plot No. 163 area 1682.48 Sq. mt. In the Column of the name of the owner at Sr. No.141 of the Form-B, (*i*) Smt. Mengabai Premeji Thakkar and (*ii*) M/s. Urmi Chemicals partner Shri D. D. Shah and 3 Others ;

And whereas, the entry required in the property card as per the Form-B the name of Smt. Mengabai Premji Thakkar and (*ii*) M/s Urmi Chemicals Partner Shri D. D. Shah and 3 others but are being shown as jointly in final plot No. 149 and final Plot No. 163, The architect on behalf Mr. Anandnagar Co. Op. Society has requested to Thane Municipal Corporation to divide the line in the sequence of the said two owners, as per the request of Architect, The Assistant Director of Town Planning Thane Municipal Corporation has communicated Government *vide* letter dated 29th September 2019 that, it is necessary to correct Form-B in respect of this Final Plots by following the procedure under section 91 of the said Act ;

And whereas, the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1219/2822/C.R.151/22/UD-12, dated 24th May 2023 authorised the Thane Municipal Corporation under sub-section 2 of Section 91 of the said Act, to undertake the said proposed variation in the Town Planning Scheme-1, Thane ;

And whereas, after consulting the Director of Town Planning Maharashtra State Pune and after making necessary enquiries, the Government *vide* Notification No. TPS-1219/2822/C.R.151/22/UD-12, dated 24th May 2023 has authorised the Thane Municipal Corporation (hereinafter referred to as the 'the said Municipal Corporation') under sub-section(2) of Section 91 of the said Act to undertake the variation to correct the "Form-B" of the said Town Planning Scheme as described in the aforesaid notification dated 24th May 2023 and accordingly to prepare and publish the draft variation as per the provision laid down under section 91(2) of the said Act (hereinafter referred to as 'the said proposed variation') ;

And whereas, the said Municipal Corporation has submitted the said proposed variation to the Government for sanction *vide* letter dated 26th October 2023 ;

And whereas, after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune and after making necessary enquires the Government is of opinion that the Proposed Variation shall be sanctioned under the provisions of section 91 (6) (*b*) of the said Act, Government hereby,

(1) Sanctions the Proposed Variation as follows :—

(2) Sanctions the Variation in the Town Planning Scheme No. 1 Thane at Sr. No.124 in the Form B, Final Plot No. 149 in the name of Smt. Mengabai Premji Thakkar and Sr No.124A as Final Plot No. 163 in the name of M/s. Urmi Chemicals partner Shri D. D. Shah and 3 others as mentioned below,

Sr. No. (1)	**Owners Name** (2)	**Final Plot No.** (3)
124	Smt. Mengibai Premji Thakkar.	149
124A	M/s. Urmi Chemicals Partner Shri. D. D. Shah and 3 others.	163

02. The sanctioned variation shall come into force with effect from the date of publication of this Notification in the *official Gazzette.*

03. This notification of sanctioned variation and " Form-B " shall be kept for inspection of the general public during office hours on all working days at the following offices for the period of 1 (one) month :-

(1) The Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.

(2) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(3) The Assistant Director of Town Planning, Thane branch, Thane.

04. This Notification shall also be available on the Govt. of Maharashtra website : *www.maharashtra.gov.in* (Acts/Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. G. MORE,

Desk Officer.

उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग, जिल्हा रायगड यांजकडून

अधिसूचना

क्रमांक उविअ/कात-२/शहाबाज/एसआर०२-२०२३/२०२५ .—ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.३) चे कलम १ पोट-कलम (३) अन्वये महाराष्ट्र उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. २०१९/(प्र.क्र.४५५)/उद्योग-१४, अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेच्या अनुसूचित विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास दिनांक १३ एप्रिल, २०२३ व दिनांक १२ सप्टेंबर २०२४ पासून लागू करण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे कलम ३२ अन्वये ज्या क्षेत्रात उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ लागू करण्यात आले आहे, त्या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास औद्योगिक किंवा उपरोक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी संपादन करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनास प्रदान केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाची शासन अधिसूचना क्रमांक आयडीसी/१८९२ (१७४४१)/उद्योग-१४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ च्या नियम २८ नुसार सदर अधिनियमाच्या कलम ३२, कलम ३३, कलम ३६ व कलम ३८ चे अधिकार आणि कलम २ (क) अन्वये **उपविभागीय अधिकारी अलिबाग, उपविभाग अलिबाग, जि. रायगड** यांना कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेले क्षेत्र महामंडळास धेरंड-शहापूर औद्योगिक क्षेत्र व विस्तारीत धेरंड शहापूर औद्योगिक क्षेत्रासाठी पोहोच रस्ता बनविण्यासाठी जमिनी संपादन करण्यात आलेल्या असून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(२), ३२(१), ३२ (५) व कलम ३२ (६) अन्वये कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तसेच जमीन मालकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३३(२) व ३३(३) अन्वये निवाडे घोषित करून नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (७) चा वापर करून सदरहू जमिनी उपरोक्त कारणांसाठी संपादीत करून व ताब्यात घेऊन ती **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ** यांजकडे हस्तांतरण करीत असल्याबाबतची अधिसूचना उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग हे प्रसिद्ध करीत आहेत.

अनुसूची

मौजे - शहाबाज, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड

अ. क्र. (१)	गट नंबर (२)	संपादनाचे क्षेत्र (हे.आर.) (३)
१	७० पै	०.०४.२०
२	७१ पै	०.११.८५
३	७२ पै	०.२०.६५
४	७३ पै	०.६०.००
५	७४ पै	०.२१.६५
६	७५ पै	०.६१.८५

(१)	(२)	(३)
७	७६ पै	०.१०.४०
८	८७ पै	०.०२.७०
९	९४ पै	०.०३.१५
१०	९५ पै	०.३७.२५
११	९६ पै	०.०७.३०
१२	९९ पै	०.०५.८५
१३	१०० पै	०.५४.५५
१४	१०१ पै	०.२७.५५
१५	५७६ पै	०.०४.००
१६	५८५ पै	०.२४.२०
१७	५८६ पै	०.३७.८०
१८	५८७ पै	०.३५.२५
१९	५८८ पै	०.३३.७५
२०	५८९ पै	०.४०.२०
२१	५९१ पै	०.०३.००
२२	६०४ पै	०.१२.५०
२३	६०७ पै	०.२६.४०
२४	६०८ पै	०.२३.००
२५	६०९ पै	०.२७.४५
२६	६१० पै	०.१८.५५
२७	६१७ पै	०.००.३०
२८	६१८ पै	०.३६.८०
२९	६१९ पै	०.४१.७०

(१)	(२)	(३)
३०	६२० पै	०.३२.१०
३१	६२२ पै	०.०३.२०
३२	६२३ पै	०.२९.९०
३३	६२४ पै	०.०१.१५
३४	६२६ पै	०.१८.००
३५	६२७ पै	०.१६.२५
३६	६२८ पै	०.४२.८०
३७	६२९ पै	०.१६.५०
३८	९८७ पै	०.०२.०५
एकूण		**८.५५.८०**

मुकेश चव्हाण,
उपविभागीय अधिकारी अलिबाग,
उपविभाग अलिबाग.

अलिबाग,
दिनांक : १० डिसेंबर २०२५

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.